सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.घनकचरा/४०४
घनकचरा व्यवस्थापन कार्यालय,
सोलापूर. दि:-२०/०८/२०१८

## -: दुसरी जाहिर निविदा :-

सोलापूर महानगरपालिका स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून खालील नमूद केलेली शौचालये पे ॲन्ड युज तत्वावर द्यावयाची असुन या कामी शौचालय वापर शुल्क म्हणून शौचालय वापरणाऱ्या व्यक्तीकडून फक्त "१ रुपया" शुल्क स्विकारायचे आहे.

सदरची निविदा ना नफा ना तोटा या तत्वावर इच्छुक स्वयंसेवी संस्था, सहकारी सेवा संस्था, सफाई कामगार संस्था, महिला बचत गट अथवा वैयक्तीक अशा स्वरूपाचे काम करणाऱ्या व्यक्तीना, सदरची शौचालय महानगरपालिकेच्या शर्ती व अटीस अधिन राहून चालवण्यास देणेचे आहे. तसेच या कामी मा.महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग – शासन मरासकआ/पत्र क्र.२१५/०७०८ दि.१०/७/२००७ चे शासन निर्णयानुसार सदर कामाचे कंत्राट स्थानिक मुक्त मैला वाहक ( वाल्मिकी / मेहतर सफाई कर्मचारी ) कुटुंबियांच्या सहकारी संस्था, सॅनिटरी मार्ट केंद्रास प्रथम प्राधान्याने कामे देण्याची अंमलबजावणी करणे बाबत शासन निर्णयात नमूद असल्याने सदर शासन निर्णया नुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

या कामी निविदाधारकाने वर नमूद माहिती बंद पाकिटात परिशिष्ट 'अ' नुसार दि.२३/०८/२०१८ ते ३१/०८/२०१८ अखेर मुख्यलेखापाल कार्यालयात द्यावयाची आहे. बंद पाकीटे दि.३१/०८/२०१८ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत मुख्यलेखापाल कार्यालयात स्वीकारले जातील. भरलेली निविदा दि.३१/०८/२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता मुख्यलेखापाल कार्यालयात समक्ष हजर राहणारे मक्तेदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडले जातील. कोणतेही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे हा अधिकार मा.आयुक्त यांचा आहे. त्याची कारणे देण्याची जबाबदारी म.न.पा.वरती नाही याची नोंद घ्यावी.

पे ॲन्ड युज तत्वावर देण्यात येणाऱ्या शौचालयांच्या ठिकाणांची यादी व शर्ती/अटी करीता घनकचरा व्यवस्थापन कक्ष सोलापूर महानगरपालिका येथे संपर्क करावा. तसेच सदर यादी व शर्ती अटी घनकचरा व्यवस्थापन विभाग, मुख्यलेखापाल कार्यालय व सामान्य प्रशासन या ठिकाणच्या नोटीस फलकावरती लावण्यात येईल.

स्थळप्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.

समन्वयक
स्वच्छ महाराष्ट्र अभियान

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

दरची निविदा भरणाऱ्या इच्छुकांनी खालीलप्रमाणे माहिती बंद पाकीटात भरून देण्याची हि.

परिशिष्ट 'अ'

कामाचे नाव :- शहरातील विविध प्रभागातील सार्व. शौचालय पे ॲन्ड युज तत्वावर चालविणेस देणेबाबत.

१) स्वयंसेवी संस्था / वैयक्तीक / बचत गट / वाल्मिकी / मेहतर समाजातील सफाई कर्मचारी यांचे संस्थेचे नाव : -

२) स्वयंसेवी संस्था / वैयक्तीक / बचत गट / वाल्मिकी / मेहतर समाजातील सफाई कर्मचारी यांचे संस्थेचा कायमचा पत्ता : -

३) संस्थेचा शासन नोंदणीकृत बाबतचा तपशिल : - (होय/नाही)

४) नोंदणीकृत असल्यास त्याचा क्रमांक व तपशिल : -

५) सदर नोंदणी बाबतची छायांकित तथा खरी नक्कल सोबत जोडणे गरजेचे आहे. ती जोडली आहे का?: - होय/नाही

६) या पूर्वी इतरत्र केलेल्या व चालविण्यात येत असलेल्या सार्व.शौचालयाची ठिकाणे व त्याचा तपशिल : - १) ३)
२) ४)

७) वरील कामे केलेल्या ठिकाणचे सक्षम अधिकाऱ्यांचे व्यवस्थापनाबाबत तथा कामाबाबतचा दाखला जोडणे गरजेचे आहे. तो जोडला आहे काय? : - (होय/नाही)

वरील सर्व माहिती व कागदपत्रे खरी असुन, ती खोटी निघाल्यास माझे / आमचे संस्थेचे सुची यादीतील नाव रद्द होणेस पात्र राहील, याची मला माहिती आहे. याबाबत मी / आम्ही कोणतेही तक्रार करणार नाही.

सही व शिक्का

स्वयंसेवी संस्था / वैयक्तीक / बचत गट / वाल्मिकी / मेहतर समाजातील सफाई कर्मचारी संस्थांचा शिक्का

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

## शर्ती व अटी :-

१) सदर शौचालय पे ॲन्ड युज तत्वावर ३ वर्षा करिता ताब्यात देण्यात येईल.

२) शौचालयाची किरकोळ दुरुस्ती ही मक्तेदाराने स्वतः करावयाची आहे व शौचालयाची स्वच्छता व निगा राखायची आहे. या बाबत मक्तेदाराने केवळ शौचालय वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून र.रु.१/- रुपया याप्रमाणे वापर शुल्क घेण्यात यावे.

सदर शौचालयाच्या ठिकाणी शौचालय वापराबाबत घेणेत येणारे प्रत्येक व्यक्तीकरीता र.रु.१/- इतके शुल्क असले बाबतचे बोर्ड लावणे बंधनकारक व तेवढेच शुल्क आकारावे तसेच जास्तीचे शुल्क आकारत असले बाबत निदर्शनास आल्यास मक्तेदारावर दंडनीय कारवाई करणेचे सर्वस्वी अधिकार हे मा.आयुक्त यांना राहतील.

३) शुल्काचे आकारणीचे मूल्यमापन करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहणार असुन मा.आयुक्त यांचे निर्णय अंतिम राहील.

४) शौचालय वापर करणाऱ्या व्यक्तीस मुतारीची मोफत सोय करून देण्याची आहे. तसेच तेथील नागरिकांकरीता मोफत उपलब्ध असणाऱ्या मुतारीच्या सोयी बाबत फलक लावावा.

५) सदर शौचालयाची देखभाल करणारे मक्तेदार-यांची स्वच्छतेच्या दृष्टीने औषधे, जंतुनाशके इत्यादी वापरण्याची तसेच सदर परिसरात अनारोग्य परिस्थिती निर्माण होऊ न देण्याची जबाबदारी असुन या कामामुळे कोणतीही जीवित हानी किंवा वित्त हानी झाल्यास त्यास मक्तेदार जबाबदार राहणार असुन त्याची तोशिष म.न.पा. ला लागू देणार नाही.

६) सदर करारपत्रातील शर्ती व अटीमध्ये बदल किंवा वाढ करण्याचे अधिकार मा.आयुक्त म.न.पा.यांना असतील. तसेच या कामी मक्तेदाराने करारपत्र करून देण्याचे असुन याबाबत कोणताही वाद झाल्यास मा.आयुक्त हे जो निर्णय देतील तो अंतिम असेल.

७) सदर करारपत्रातील सर्व शर्ती व अटी या मक्तेदार व त्यांचे वाली / वारसदार यांच्यावर बंधनकारक राहतील.

८) ज्या कामासाठी शौचालयाचा मक्ता दिला आहे त्या ठिकाणाचा वापर त्याच कामासाठी करावा, अन्य कामासाठी व अवैध कामासाठी वापर होत असल्यास मक्तेदारावर कारवाई करण्याचे सर्वस्वी अधिकार मा.आयुक्त यांना असतील.

९) सदर शौचालयाचे बांधकाम वापरात बदल करण्यात येऊ नये तसे निदर्शनास आल्यास मक्तेदारावर कारवाई करण्यात येईल.

१०) सदरच्या कामी पोट मक्ता दयावयाचा नाही तसेच सदरच्या जागेत पोटभाडेकरू अथवा इतर उत्पन्नाची साधने वापरून उत्पन्न घेतलेस मक्तेदारावर कारवाई करण्यात येईल.

११) विशिष्ट परिस्थितीत किंवा जागेवरील वस्तुस्थिती नुसार सदर कामातील शर्ती व अटी मधील शिथिलता देण्याचे सर्वस्वी अधिकार हे मा.आयुक्त यांना राहतील.

१२) मक्तेदाराने म.न.पा.सोबत योग्य त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपर वरती करारपत्र करून देणे बंधनकारक आहे.

१३) सदरच्या सार्व.शौचालयाची जागा ठरलेल्या करारपत्राच्या कालावधीच्या आत भावी काळात महानगरपालिकेस लागणार असल्यास मक्तेदाराने विनामुल्य विनामोबदला तथा नुकसान भरपाई न घेता ज्या स्थितीत ताब्यात घेतले त्याच स्थितीत महानगरपालिकेकडे ताब्यात देणे बंधनकारक राहील आवश्यक आहे.

१४) मक्तेदार यांनी देण्यात आलेल्या सक्षम मंजुरीचे कागदपत्रे जागेवर ठेवणे आवश्यक आहे.सदर कागदपत्रे महानगरपालिकेच्या संबंधित कर्मचाऱ्याने तपासणी करीता मागितल्यास दाखविणे आवश्यक आहे.

१५) शौचालय नेहमी स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मक्तेदाराची असून तपासणीवेळेस शौचालय अस्वच्छ आढळल्यास मक्तेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल व दंडाची रक्कम मा.आयुक्त हे ठरवतील व मक्तेदारास ती मान्य राहील.

१६) सदर सुलभ शौचालयाच्या ठिकाणी कोणत्याही अनधिकृत बाबी तसेच अव्यवहारीक वर्तणूक याबाबत महानगर पालिकेच्या निदर्शनास आल्यास सदर सार्व.शौचालय महानगर पालिकेच्या ताब्यात घेण्याचा अधिकार हा सर्वस्वी मा.आयुक्त यांना राहील.

१७) सदर ठिकाणी कोणत्याही वाद / तंटा / भांडण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मक्तेदारावर राहील.

१८) सदर ठिकाणच्या कामगारांच्या नियुक्तीबाबत सर्वस्वी जबाबदारी मक्तेदारावर राहील.

१९) शौचालय सुरु ठेवण्याची वेळ दररोज पहाटे ५:३० ते रात्री ११:०० वाजेपर्यंत राहील.

२०) सदरहू मंजूर सुची मध्ये कोणत्या स्वयंसेवी संस्था / वैयक्तीक / बचत गट / वाल्मिकी / मेहतर समाजातील सफाई कर्मचारी संस्थेचा अंतर्भाव करावयाचा आहे याचे संपूर्णतः अधिकार महानगरपालिकेकडे राहणार असुन कोणत्याही संस्थेचा या सुचीमध्ये समावेश केला नाही या बद्दल कारणे देणे महानगरपालिकेस बंधनकारक राहणार नाही.

२१) सदर करारपत्र सोलापूर शहरातील न्याय कक्षेच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

वरील सर्व नियम व अटी मी/आम्ही पूर्णपणे वाचले असुन मला / आम्हास ते मान्य आहेत.

सही व शिक्का

स्वयंसेवी संस्था / वैयक्तीक / बचंत गट / वाल्मिकी / मेहतर समाजातील सफाई कर्मचारी यांची शासन नोंदणीकृत संस्था

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

स्वच्छ भारत मिशन – स्वच्छ महाराष्ट्र अभियान

दुसऱ्या निवेदेकरिता सार्वजनिक / सामुदायिक शौचालय पे अॅन्ड युज तत्वावर द्यावयाच्या ठिकाणांची यादी

| जुने प्रभाग | अ.क्र. | शौचालयाचे ठिकाण | बैठक व्यवस्था | | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्त्री | पुरुष | | |
| ७ | १ | बागले वस्ती | ४६ | ८० | १२६ | |
| | २ | मराठा वस्ती | ४० | १० | ५० | |
| ८ | ३ | मातंग वस्ती | १८ | १० | २८ | |
| | ४ | बाणेकरी तालीम | २५ | २५ | ५० | |
| ४ | ५ | जोशी गल्ली | २८ | १० | ३८ | |
| ६ | ६ | घोंगडे वस्ती | ६० | ४० | १०० | |
| २८ | ७ | थोबडे वस्ती, रितेश शाळेसमोर | ३१ | २५ | ५६ | |
| | ८ | सेटलमेंट फ्री कॉलनी नं.६, पोस्ट धट्टी, किराणा दुकानाचे बाजूस | १६ | ८ | २४ | |
| | ९ | सेटलमेंट फ्री कॉलनी नं.६, दुर्गा माता मंदिर जवळ | २२ | २० | ४२ | |
| | १० | सलगरवस्ती दत्तात्रय तालीम जवळ श्री.वाकसे घराजवळ | १० | १० | २० | |
| २९ | ११ | लिमेयवाडी मस्जिद जवळ | १४ | २४ | ३८ | |
| | १२ | सेटलमेंट कॉ.नं..२ पोलिस लाईन | १६ | १४ | ३० | |
| | १३ | सेटलमेंट कॉ.नं.२ सिमेंट धट्टी मंदिर जवळ | १० | १० | २० | |
| | १४ | शहानगर पारधी धट्टी | १० | १० | २० | |
| ३० | १५ | रेवणसिद्ध झोपडपट्टी | १५ | १५ | ३० | |
| | १६ | थोरली इरण्णा वस्ती | ११ | १२ | २३ | |
| ४६ | १७ | गरिबी हटाव झो.नं.१ वि.रोड | १५ | १४ | २९ | |
| | १८ | उत्कर्ष नगर भाग ४ | १० | १० | २० | |
| १० | १९ | हब्बू वस्ती | १० | १० | २० | |
| | २० | नरळे धट्टी अमराई | २० | ० | २० | |
| ३२ | २१ | जगजीवनराम झोपडपट्टी वांगीरोड | ४५ | ३६ | ८१ | |
| २४ | २२ | प्रजा धट्टी | १८ | २४ | ४२ | |
| | | एकूण बैठका | ४९० | ४१७ | ९०७ | |

20.8.18

दिपक पवार
समन्वयक
स्वच्छ महाराष्ट्र अभियान